मे (प्रथम) २०२१ | ₹ ३०.००

चंपक

मराठी



सबस्क्राईब करण्यासाठी ९८३३१५१५४५ वर मेसेज पाठवा
वा पाहा delhipress.in
पुढील 'ई एडिशन मोफत' मिळवण्यासाठी वरील क्रमांकावर मेसेज पाठवा.

HAEMOCAL®

Delicious Taste

SUNCARE
A WHO GMP COMPANY
SURE SAFE SECURE

ग्लूकोजने परिपूर्ण आयर्न टॉनिक

भूक न लागणे | एनिमिया (शरीरात रक्त कमी होणे) | चक्कर येणे | अशक्तपणा

आयर्न आणि फॉलिक ॲसिडसह जीवनात ऊर्जा भरा. मुलांच्या योग्य विकासासाठी, गर्भावस्थेत आयर्नची कमतरता दूर करण्यासाठी आणि मासिक पाळीवर नियंत्रण ठेवण्यासाठी हेमोकॉल हा एक उत्तम उपाय आहे. हे रक्तातील आरबीसी म्हणजे लाल रक्त पेशींची संख्या वाढवण्याचे कार्य करते, ज्यामुळे थकवा आणि अशक्तपणा दूर होतो. ग्लुकोजने समृद्ध केलेला त्याचा अनोखा ऑरेंज फ्लेवर त्याची छान चव बनवतो.

STOMAFIT®

लिक्विड व टॅबलेट्स

आपले पोट तंदुरुस्त आणि निरोगी ठेवा

जास्त आंबटपणा, जळजळ
आणि मळमळ, अतिसार बद्धकोष्ठता,
आंबट ढेकर, अपचन,
गॅसमुळे छातीत दुखणे, या सर्व लक्षणांमुळे
पोट अस्वस्थ होणे

मेन्थॉल आणि थायमॉलच्या गुणवत्तेसह

SCAN TO BUY HAEMOCAL

Please contact for more information:
SUNCARE FORMULATIONS PVT. LTD.
Ph.: 8447977889/ 999, 011-46108735, Mail: info@stomafit.com
Available on all major Online Pharmacies

SCAN TO BUY STOMAFIT

चंपक

मे (प्रथम) २०२१ अंक : १०१३

FOUNDER
VISHWA NATH
1917-2002

मजेदार गोष्टी

जंगलातील निवडणूक	४
प्रिय नर्स दादा	१२
पंख्यांची प्रशंसक फराह	२१
विचित्र सहाय्यक फुरु	३३
शांत महाराणी	४३

मनोरंजन

१७ ॲक्टिविटी फक्त आपल्यासाठी

सुंदर रंग भरा	८
मार्ग दाखवा	९
हसू नका बरे!	१०
ओळखा पाहू	१८
शब्द शोधा	१९
वय जुळवा	२०
ठिपके जोडा	२६
मी गुप्तहेर आहे	२७
स्मार्ट	३०
चित्र पूर्ण करा	३२
उन्हाळ्याचा उन्माद	४०
आकृत्यांचे क्रम बनवा	४१
फरक सांगा	४२
हॉस्पिटलची शिकार	४७

चित्रकथा

डमरु आणि बँक खाते	११
चीकू	२४
आजोबा आणि जागतिक नर्स दिन	३८

मुखपृष्ठ

यंदा तुम्ही उन्हाळ्याची सुट्टी कशी घालवत आहात? घाबरु नका. काही आकर्षक ॲक्टिविटीज या अंकात दिल्या आहेत. त्यांनी उन्हाळ्यावर मात करा, मजा करा.

विशेष पृष्ठ

मजेदार विज्ञान	१७
मँगो पॉपसिकल	२८
छोट्यांच्या लेखणीतून	४८

संपादक व प्रकाशक परेश नाथ

मुख्य संपादकीय व जाहिरात आणि प्रकाशन कार्यालय : दिल्ली प्रेस भवन, ई-८, झंडेवाला इस्टेट, राणी झांसी मार्ग, नवी दिल्ली - ११० ०५५.

संपादकीय कार्यालय : **ए-७, श्रीराम इंडस्ट्रियल इस्टेट, गं. द. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई** - ४०० ०३१. **दूरध्वनी :** (०२२) २४१५७३९६, वितरण विभाग : **दूरध्वनी :** (०२२) ४३४७३०५०, २४१२ २६६१.

जाहिरात कार्यालय : ए-४ श्रीराम इंडस्ट्रियल इस्टेट. गं. द. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई - ४०० ०३१. दूरध्वनी : (०२२) २४१० ०८४४

दिल्ली प्रेस पत्र प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता प्रकाशक आणि मुद्रक परेश नाथ द्वारा पीएस पीसी प्रेस प्रायव्हेट लिमिटेड, डीएलएफ-५०, इंडस्ट्रियल एरिया, फरीदाबाद, हरियाणा-१२१००३, दिल्ली प्रेस ई-८, झंडेवाला इस्टेट, नवी दिल्ली येथे मुद्रित आणि ई-८, झंडेवाला इस्टेट, नवी दिल्ली येथून प्रकाशित.

Editor, Publisher & Printer : Paresh Nath
Printed at PS PC Press Pvt. Ltd. DLF-50, Industrial Area, Faridabad, Haryana-121003. and Delhi Press E-8, Jandewala Estate New Delhi - 110 055 and Published on behalf of Delhi Press Patra Prakashan Private Ltd. From E-8, Jhandewala Estate, New Delhi - 110 055

वितरण, वर्गणी व प्रकाशित मजकुरासंदर्भातील सर्व तक्रारी दिल्ली येथील न्यायालय/मंच/लवादाच्या अखत्यारीत सोडविल्या जातील. या अटीवर सदर अंकाची विक्री करण्यात येत आहे.

'चंपक'मध्ये प्रकाशित झालेल्या गोष्टी पूर्णतः काल्पनिक असून वास्तविक स्थळं, व्यक्ती, संस्था व प्रसंगाचा उल्लेख निव्वळ योगायोग समजावा. पुरेसं टपालहंशील लावलेलं आणि स्वतःचं नाव-पत्ता असलेलं पाकीट पाठविल्यासच अस्वीकृत साहित्य परत केलं जाईल. प्रसिद्धीसाठी पाठविलेलं साहित्य गहाळ अथवा खराब झाल्यास कार्यालय जबाबदार असणार नाही.

'दिल्ली प्रेस पत्र प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड'च्या परवानगीशिवाय कोणत्याही रचना कुठल्याही प्रकारे उद्धृत करु नये. 'चंपक' व 'चीकू' ही शीर्षके भारत सरकारकडे रजिस्टर्ड केलेली आहेत.

वार्षिक वर्गणी ड्राफ्ट किंवा मनीऑर्डरद्वारे 'दिल्ली प्रकाशन वितरण प्रायव्हेट लिमिटेड'च्या नावे बी-३, वडाळा उद्योग भवन, नायगाव क्रॉस रोड, वडाळा, मुंबई - ४०० ०३१ या पत्त्यावर पाठवावी. चेक व व्ही.पी.पी. स्वीकारले जाणार नाहीत. एका प्रतीची किंमत : रु. ३०/-, वार्षिक वर्गणी : रु. ७५०/-, द्वैवार्षिक : रु. १,४५०

गोष्ट /ड्रॉइंग/इंटर्नशिप संपर्कासाठी ईमेल :grihshobha.pr@delhipress.in व्हॉट्सएप / मोबाईल : ७४००१०४७६०
सेल्स सबस्क्रिप्शन माहितीसाठी : circulation.mumbai@delhipress.in मोबाईल : ९८३३९१६४३०, ९८३३१५१५४५

जंगलातील निवडणूक

गोष्ट ● आरती मंडलोई

मध्य प्रदेशात सातपुडा पर्वतरांगांमध्ये चंपकवन नावाचे घनदाट जंगल होते. शेरसिंह तिथले राजा होते. शेरसिंह खूप चांगले राजा होते आणि ते आपल्या प्रजेची खूप काळजी घ्यायचे. त्यांच्या राज्यात शाकाहारी आणि मांसाहारी दोन्ही प्रकारचे प्राणी मिळून मिसळून जंगलात राहायचे. जंगलात सर्वांसाठी पुरेसे अन्न आणि पाणी होते. कोणालाही कसलीच भीती नव्हती. त्यामुळे सगळे शेरसिंहाला खूप पसंत करायचे.

अशाप्रकारे सगळे मजेत आपले जीवन व्यतीत करत होते. तेव्हा एक दिवस जेव्हा चंदू गाय आपल्या मित्रांसोबत पाणी पिण्यासाठी नदीमध्ये गेली. तेव्हा तिच्यावर एका वाघाने हल्ला केला. चंदू आणि तिचे मित्र वाघाला पाहून खूप घाबरले. वाघ त्यांच्या चंपकवनाचा वाटत नव्हता. कोणालाच ठाऊक नव्हते की तो कोण आहे आणि कुठून आला आहे. हल्ल्यात चंदू घायाळ झाली. वास्तविक कसेबसे तिने आपला जीव वाचवला होता. तिने विचार केला की याविषयी शेरसिंहाला सांगितले पाहिजे की जंगलात एक वाघ आला आहे, तो जंगलाचे नियम तोडून सर्व प्राण्यांवर विनाकारण हल्ला करीत आहे. सर्व गाईंना चंदूचे बोलणे योग्य वाटले त्या सगळ्या एकत्र शेरसिंहला याविषयी सांगण्यासाठी निघाल्या.

शेर सिंहाच्या गुहेजवळ पोहोचताच त्यांनी पाहिले की तिथे आधीपासूनच डॅनी हरिण, जम्पी माकड आणि गोगो बकरी उपस्थित होते. त्यांच्यातील पुष्कळ प्राणी घायाळ झाले होते आणि त्यांचे मित्रदेखील त्या वाघाच्या हल्ल्यात मारले गेले होते.

जसे शेरसिंह बाहेर आले, चीकू सशाने त्यांना सगळे काही सांगितले. तो हेदेखील म्हणाला की हा वाघ प्राण्यांना धमकावत होता आणि जंगलाचा नवीन राजा बनण्याचा प्रयत्न करीत होता. चीकूचे बोलणे शांतपणे ऐकल्यानंतर शेरसिंहाने इतर प्राण्यांचेदेखील गाऱ्हाणे ऐकले. सगळ्यांचे बोलणे ऐकल्यानंतर



शेरसिंह ताबडतोब नदीच्या दिशेने निघाले जिथे त्या घमेंडी वाघाला पाहिले होते. तो वाघ नदी जवळ लपून बसायचा आणि जशी प्राण्यांची झुंड पाणी पिण्यासाठी तिथे यायची, तो वाघ त्यांच्यावर हल्ला करून कित्येक प्राण्यांना जखमी करायचा.

जसे शेरसिंह नदीजवळ पोहोचला, वाघाने ताबडतोब त्याला पाहिले आणि झुडपांच्या पाठीमागून ओरडून म्हणाला, ''शेरसिंह, आता या जंगलात तुझे नाही, माझे राज्य चालणार. तू गुपचूप इथून निघून जा, नाहीतर मी तुझ्यावर हल्ला करेन.'' त्याचे बोलणे ऐकून शेरसिंह म्हणाला, ''हे जंगल माझे घर आहे आणि इथल्या सर्व प्राण्यांचे संरक्षण करणे ही माझी जबाबदारी आहे. मी त्यांना सोडून कुठेही जाणार नाही. तुला लढायचे असेल तर बाहेर येऊन माझा सामना कर.''

हे ऐकून वाघ झुडपांच्या पाठीमागून येऊन शेरसिंहवर तुटून पडला. अचानक झालेल्या या हल्ल्यासाठी शेरसिंह तयार नव्हता. त्यामुळे तो दूर जाऊन पडला.

शेरसिंहच्या पाठोपाठ जंगलातील इतर प्राणीदेखील नदीकिनाऱ्यावर आले होते. आपल्या राजाची ही हालत पाहून सगळे घाबरले, तेव्हा शेरसिंह उठला आणि त्याने वाघावर जोरदार हल्ला केला. यात वाघाला जखम झाली पण तो हार मानणारा नव्हता त्याने ताबडतोब पलटून शेरसिंहावर हल्ला केला. त्याच्या एका पायाचा चावा घेतला. शेरसिंहाच्या पायातून रक्त वाहू लागले, पण त्यानेदेखील उत्तरादाखल हल्ला करून वाघाच्या पाठीवर आपल्या पंजांनी हल्ला केला.

तिकडे लढाई वाढत असलेली पाहून चीकूला काळजी वाटली आणि तो पळत वयस्कर हत्ती आजीकडे पोहोचला जी जवळपास ८० वर्षांची होती. ती हत्तींच्या कळपाची लीडर होती आणि संपूर्ण जंगल तिचा आदर सन्मान करायचे. त्यामुळे चीकू तिला संपूर्ण घटना सांगून याचा उपाय शोधण्याची विनंती करण्यासाठी

गेला होता. चीकूचे बोलणे ऐकून जॉली आजी त्याच्यासोबत नदीकिनारी निघून आली. तोपर्यंत शेरसिंह आणि वाघ लढत जखमी झाले आणि थकलेही होते. पण तरीदेखील जंगलाचा राजा कोण बनेल याचा निर्णय होऊ शकला नव्हता.

हत्ती आजीला येताना पाहून सर्व प्राण्यांनी तिला पुढे येण्यासाठी जागा दिली. पुढे येऊन जॉली आजी जोराने ओरडली. जंगलात हत्तींशी वाघ आणि सिंहदेखील नडत नाहीत. त्यामुळे दोघे आपापल्या जागी गुपचूप उभे राहिले.

सर्वांना गप्प झालेले पाहून जॉली आजीने आपले बोलणे सुरू केले. ती म्हणाली, ''ह बघा, चंपकवन इथे राहणाऱ्या सर्व प्राण्यांचे आहे. त्यामुळे या गोष्टीचा निर्णयदेखील त्यांनीच घ्यायला हवा की आपला राजा ते कोणाला निवडू इच्छितात. या गोष्टीचा निर्णय करण्यासाठी उद्या जंगलांमध्ये निवडणूक होईल. सर्व प्राणी आपापल्या कळपांसोबत उघड्या मैदानात जमा होतील, जिथे आपल्या आवडत्या उमेदवाराला मत देतील. ज्याला सगळ्यात जास्त मते मिळतील तोच राजा बनेल आणि दुसऱ्याला हे जंगल सोडून जावे लागेल.''

हे ऐकून सगळे प्राणी आपापल्या घरी परतले आणि दुसऱ्या दिवशी सकाळी सकाळी सर्व खुल्या मैदानात जमा झाले.

चीकू सशाने जम्पी माकडाच्या कळपासोबत मिळून निवडणुकीची संपूर्ण तयारी केली होती. मतदान सुरू झाले आणि रात्री उशिरापर्यंत चालू राहिले. जॉली

मतदानावर आपली नजर ठेवून होती, जेणेकरून कोणतीही गडबड होऊ नये. सूर्यास्त होण्याच्या थोड्या वेळापूर्वी त्यांनी सगळ्यांना मैदानातच बसून राहण्याचे आणि जम्पीच्या टीमला एक एक मत सगळ्यांसमोर मोजण्याचे काम दिले गेले. मोजता मोजता सूर्यास्त झाला आणि रात्री पौर्णिमेचा सुंदर चंद्र आकाशात चमकू लागला.

मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर जॉली आजी आली आणि विजेता घोषित करण्यापूर्वी म्हणाली, ''एक चांगला राजा तोच असतो, जो आपल्या प्रजेची काळजी घेतो, त्याच्या राज्यात त्याची प्रजा निर्धोकपणे जीवन जगू शकते आणि हर तऱ्हेने संपन्नता असते. कोणाला घाबरवून धमकावून तुम्ही आदर आणि प्रेम मिळवू शकत नाही. प्रजेच्या आदर आणि प्रेमाशिवाय राजा अपूर्ण असतो. चंपकवनाची प्रजा आपला राजा शेरसिंहाचा आदर आणि प्रेमदेखील करते. त्यामुळे चंपकवनातील सर्व प्राण्यांनी शेरसिंहला पुन्हा आपला राजा म्हणून निवडले आहे.''

हे ऐकताच चहुकडे आनंदी आनंद झाला. सगळे प्राणी आनंदाने ओरडू लागले. शेरसिंहदेखील स्मितपणे हसले आणि तो वाघ आपला पराजय पाहून गुपचूप चंपकवनातून निघून गेला. चंपकवन पुन्हा एकदा हसू लागले होते. ●

सुंदर रंग भरा

मार्ग दाखवा

८ मे हा जागतिक स्थलांतरित पक्षी दिन आहे.
फ्लेमिंगोला त्याच्या मित्रांपर्यंत पोहोचण्यास मदत करा.



उत्तर : शेवटच्या पानावर पाहा.

हसू नका बरे!

पप्पू (शिक्षिकेला) : मॅम, जेव्हा आपण राष्ट्रगीत गात असतो तेव्हा आपण अगदी मूर्तीसारखे सरळ उभे असतो, मी बरोबर बोलतोय ना?
शिक्षक : होय, बरोबर.
पप्पू : पण मॅम, जेव्हा आपण राष्ट्रगीत गात असतो, त्याच वेळी जर आपला राष्ट्रीय प्राणी तेथे आला तर आपल्याला पळायला हवे की उभेच राहायला हवे.

पल्लवी नेगी, १२ वर्ष
लखनऊ

सानवी (किरणला) : असं काय आहे, जे फास्ट लाऊड आणि कुरकुरीत आहे?
किरण : झुरळ.
संवी : नाही, रॉकेटची एक चिप.

हरिता मेहता, ८ वर्ष
अहमदाबाद

किट्टू (चीकूला) : वाढदिवसाचा केक दगडासारखा कठोर का होता?
चीकू : कारण तो एक संगमरवरी केक होता.

रुद्र मावानी, १२ वर्ष
वडोदरा

राकेश (रोहनला) : तू कोणत्या प्रश्नाचे उत्तर 'होय' असे कधीही देऊ शकत नाही?
रोहन : तू अजूनही झोपत आहेस?

कमल जैन, ११ वर्ष
नवी दिल्ली

मॅनेजरने एका मुलाखतीत सांताला विचारले : असा एखादा शब्द तुला उच्चारता येईल काय, ज्यात १०० पेक्षा जास्त लेटर्स आहेत?
सांता : पोस्ट बॉक्स.

आश्वी वाघ, १० वर्ष
गुजरात

हंस (वंशला) : तपकिरी, केसाळ आणि सनग्लासेस घातलेले असे काय आहे?
वंश : सुट्टीला गेलेला एक कोकोनट म्हणजे नारळ.

शारदा, ९ वर्ष
बेकल

राहुल आणि जगन बऱ्याच वेळेपासून सिटी सेंटरमध्ये जॉगिंग करत होते. काही वेळानंतर.
राहुल म्हणाला : मी आता थकलो आहे. चल, गोल्डनमिल्क वर जाऊया आणि कोल्ड कॉफी पिऊया, मी ऐकले आहे की ती खूप चविष्ट आहे.
जगन : तू वेडा आहेस का? आपल्याला फूड पॉइजनिंग होईल.
राहुल : ते कसं?
जगन : तिथे लिहिलेली सूचना पहा. लिहिले आहे की 'सन १९९१ पासून' आपण ७० वर्ष जुनी कोल्ड कॉफी पिणार आहात.

ओम मक्कड, ११ वर्ष
बंगळुरू

नयन (आर्यनला) : तू चिनी भाषा वाचू शकतो का?
आर्यन : होय, जर ती मराठी आणि इंग्रजीमध्ये लिहिली असेल तर हा, हा, हा.

किट्टू, ७ वर्ष
हजारीबाग

विद्यार्थी (शिक्षकाला) : सर, आम्ही अशी एक वस्तू बनविली आहे, ज्याद्वारे आपण भिंतीच्या आरपार पाहू शकतो.
शिक्षक (आनंदाने) : व्वा, काय कमाल आहे. ती वस्तू काय आहे, बाळा?
विद्यार्थी : सर, एक छिद्र.

अश्विनी कुमार, १२ वर्ष
दिल्ली

हाहाहा हाहाहा हीहीही हीहीही

बिट्टू (सिटूला) : वैज्ञानिक आपला श्वास कसा ताजेतवाने करतो.
सिटू : एक्सपेरिमिंटने.

नीमा के, ७ वर्ष
केरळ

तुमची कोडी, विनोद, चित्र वा कथा, तुमचं नाव, वय, पत्ता तसंच दूरध्वनी क्रमांक लिहून पाठवा :
चंपक, दिल्ली प्रेस, ए-४, श्रीराम इंडस्ट्रीयल इस्टेट, वडाळा, मुंबई ४०० ०३१.
ईमेल : writetochampak@delhipress.in
आणि SMS: 9619587613
ऑनलाइन विजिट करा :
www.facebook.com/ChampakMagazine
https://www.youtube.com/ChampakSciQ

डमरू आणि बँक खाते

गोष्ट ● शिवेश श्रीवास्तव



प्रिय नर्स दादा

गोष्ट ● वंदना गुप्ता

पारसचे वडील पेशाने डॉक्टर होते. त्यांचे स्वतःचे नर्सिंग होम होते, ज्यात रुग्णांना राहण्यासाठी १० खोल्या आणि एक ऑपरेशन थिएटर होते. वेळोवेळी तिथे इतरही डॉक्टर यायचे. याशिवाय त्यांनी रुग्णांची देखभाल करण्यासाठी काही नर्स नियुक्त केल्या होत्या.

एक दिवस संध्याकाळी पारस आपल्या मित्रांसोबत खेळत होता, तेव्हा शेजारी राहणारी त्याची मैत्रीण अनु चॉकलेट्स घेऊन आली आणि सर्वांना वाटू लागली.

''आज तुझा बर्थडे आहे का?'' पारसने विचारले.

''नाही नाही, बर्थडे नाहीए. माझ्या दादाचे कॉलेजमध्ये ॲडमिशन झाले आहे. ४ वर्षांनी

तो अभ्यास करून नर्स बनेल,'' अनु आनंदाने उसळत म्हणाली.

''परंतु नर्स का बनताहेत? नर्स तर मुली बनतात. त्यांनी डॉक्टर बनायला हवे. माझे बाबा किती मोठे डॉक्टर आहेत. सर्व रुग्ण त्यांची वाट पाहत असतात, जेव्हा ते सफेद कोट घालून आणि स्टेथोस्कोप घेऊन येतात, तेव्हा किती रुबाब वाढतो,'' पारस ऐटीत म्हणाला.

हे ऐकून अनुचा चेहरा उतरला. ''नर्स तर कोणीदेखील बनू शकते. त्या कॉलेजमध्ये मुलं आणि मुली सगळेच शिकतात,'' असे म्हणून उदासपणे ती परत गेली.

काही दिवसांनी पारसच्या आजोबांच्या पोटात अचानक दुखायला लागले. पारसच्या वडिलांनी तपासले आणि सांगितले की त्यांना किडनीमध्ये स्टोन आहे. ताबडतोब ऑपरेशन करावे लागेल. लवकरच त्यांचे ऑपरेशन झाले. आता त्यांना २-३ दिवस नर्सिंग होममध्येच राहायचे होते. पारसच्या सुट्ट्या सुरु होत्या.

रात्री बाबा घरी आले तेव्हा पारसने त्यांना विचारले, ''मी आजोबांना भेटायला जाऊ शकतो का?''

''ठीक आहे उद्या जा. परंतु त्यांना अजिबात त्रास देऊ नकोस. त्यांना आरामाची गरज आहे,'' बाबा म्हणाले.

दुसऱ्या दिवशी पारस आपल्या आजोबांकडे

गेला. काही वेळाने तिथे खोलीत रोझी नावाची नर्स आली आणि तिने आजोबांना विचारले, ''कशी तब्येत आहे? नाश्ता केला का तुम्ही?''

आजोबांनी हो म्हणून मान डोलावली.

रोझीचे स्मार्ट कपडे, केस बांधण्याची स्टाईल आणि प्रेमाने हसून बोलण्याची पद्धत पारसला खूप आवडली. जेव्हा ती त्या खोलीतून दुसऱ्या खोलीत जाऊ लागली, तेव्हा पारसदेखील तिच्या पाठीपाठी जाऊन त्या खोलीत डोकावू लागला.

तिथे त्याच्याच वयाचा एक मुलगा होता.

‘‘हे काय? तू अजूनपर्यंत नाश्ता संपवला नाहीस?’’ रोझीने त्या मुलाला विचारले.

‘‘बघा ना सिस्टर, कधी पासून प्रयत्न करीत आहे, पण खातच नाहीए. ओटचा नाश्ता आवडत नाही, असे म्हणतोय,’’ त्याच्या आईने तक्रार केली.

‘‘परंतु ओट आपल्या तब्येतीसाठी खूप फायदेशीर आहे बाळा, जेव्हा ठीक होशील तेव्हा आई हलवादेखील बनवून खाऊ घालेल. पण बरे होण्यासाठी नाश्ता आणि औषधे खाणे तर खूप गरजेचे आहे ना. खाल्लं नाहीस तर लवकर खेळण्यायोग्य कसा बनशील?’’

बोलत बोलत रोझीने त्या मुलाला ओट खाऊ घातला. ती त्या मुलाला औषधे खाऊ घालून निघतच होती, इतक्यात ७ नंबरच्या खोलीतून एक स्त्री घाबरत आली आणि म्हणाली, ‘‘सिस्टर, माझ्या नवऱ्याच्या पायात खूप वेदना होत आहेत. जरा येऊन पाहता ना,’’ रोझी वेगाने तिच्या सोबत गेली. पारसनेदेखील तिच्या पाठीमागे जाऊन त्या खोलीत डोकावून पाहिले.

‘‘तुमच्या पायाची कित्येक हाडे तुटली आहेत. याच्यावर भार टाकाल तर वेदना तर होतीलच,’’ पेशंटच्या बसण्याची पद्धत पाहून रोझी म्हणाली.

‘‘सिस्टर मी पडल्यापडल्या बोर झालो होतो. त्यामुळे बसण्याचा प्रयत्न करीत होतो,’’ त्या खोलीतील पेशंट म्हटणाला.

‘‘मी तुम्हाला सांगते कशापद्धतीने बसायचे आहे,’’ असं म्हणून रोझीने प्रथम त्याचा पलंग पाठीमागून उंच केला. नंतर दुसऱ्या पायाचा आधार घेऊन हळुवारपणे बसवले.

‘‘आता ठीक आहे? जास्त वेदना झाली तर इंजेक्शन देऊ का?’’ रोझीने विचारले. त्याने हो म्हणून मान हलवली तेव्हा तिने त्याला इंजेक्शन दिले.

खोलीतून बाहेर निघते वेळी रोझीची नजर पारसवर पडली, तेव्हा ती



प्रेमाने त्याच्या डोक्यावरून हात फिरवत म्हणाली, ''बाळा तुझ्या खोलीत जा. अशाप्रकारे सगळ्यांच्या खोलीत जाण्यामुळे तुला इन्फेक्शन होऊ शकते.''

''किती काळजी घेते ही सगळ्यांची,'' पारस आजोबांकडे येताना मनात विचार करीत होता.

जोपर्यंत आजोबा तिथे होते, पारस रोज त्यांच्या जवळ जायचा. कधी तिथल्या नर्स कोणाला औषधे देत असायच्या, तर कधी त्या आधार देऊन फिरवत असायच्या, कधी कोणाला ड्रेसिंग करायच्या तर कधी कोणाचे ब्लडप्रेशर मोजायच्या.

''किती मेहनत करतात या सगळ्या,'' पारसने विचार केला. आता त्याला नर्स चांगल्या वाटू लागल्या होत्या. त्याला अनुचा विचार डोक्यात आला. तिचा दादादेखील असाच सर्वांची सेवा करेल.

मी उगाचच त्या दिवशी तिला म्हणालो की तो डॉक्टर का झाला नाही. ती किती उदास झाली होती. मला असे म्हणायला नाही पाहिजे होते.

काही दिवसांनी पारसचे वडील काही भेटवस्तू पॅक करवून घेऊन आले.

''हे कोणासाठी आणले आहे बाबा?'' पारसने विचारले.

''बाळा, १२ मेला इंटरनॅशनल नर्स डे आहे. त्या विशेष दिवशी मी आपल्या नर्सिंग होम मधल्या सर्व नर्सना भेटवस्तू देऊन सन्मानित करेन.''

''हे तर खूप चांगले काम करीत आहात बाबा. जेव्हा आजोबा आजारी होते तेव्हा मी पाहिले की या नर्स किती मेहनतीने काम करतात.''

''हो बाळा, नर्सचे काम खूप कठीण आणि जबाबदारीचे असते. जर एखाद्या रुग्णाला चुकीच्या पद्धतीने उठवले किंवा चुकीचे औषध दिले तर खूप त्रास होऊ शकतो. त्यांना रात्रीच्या शिफ्टमध्येदेखील काम करावे लागते. त्यांना रात्रभर सावध राहावे लागते. एखाद्या

रुग्णाचे सलाईन संपत असेल तर त्याचे औषध बदलावे लागते. जर कोणी रुग्ण अंथरुणातून उठू शकत नसेल तर त्या त्याची घाणदेखील साफ करतात.''

''काय तू समजू शकतोस बाळा, बहुतेक रुग्ण अंथरुणावर पडल्या पडल्या औषधे आणि साध अन्न खाल्ल्यामुळे चिडचिडे होतात. त्यांना खूप प्रेम आणि धैर्याने सांभाळावे लागते आणि सगळे नर्स हे काम खूप चांगल्या पद्धतीने करतात,'' पारसच्या वडिलांनी एका सुखद हास्य सोबत बोलणे संपवले.

हे सर्व समजून पारसने एक निर्णय घेतला. त्याने अनुच्या दादासाठी एक सुंदर ग्रीटिंग कार्ड बनवले आणि त्यावर त्याने आपल्या आवडीचे चॉकलेटदेखील टेपने चिकटवले. कार्डवर त्याने लिहिले, 'माझ्या प्रिय नर्स दादासाठी.'

१२ मेला पारस अनुच्या घरी गेला आणि त्याने तिच्या दादाला ते कार्ड दिले.

''पण अजून मी नर्स बनलो कुठे आहे?'' तो हसत म्हणाला.

''पण होणार तर आहेस,'' पारस म्हणाला.

मग पारस अनुला म्हणाला, ''मला माफ कर. मला ठाऊक नव्हते की नर्सचे काम इतके महत्त्वपूर्ण असते. आज मला तुझ्या दादाच्या नर्स बनण्यावर गर्व आहे.''

हे ऐकून अनु खूप खुश झाली. ●

मजेदार विज्ञान

प्रकाशाचे गुण शोधणे

कागदाच्या टॉवेलवर म्हणजेच टिशू पेपरवर विलक्षणपणे एक इंद्रधनुष्य बनवा.

तुम्हाला हवे :

- टिशू पेपर
- स्केच पेन
- पाण्याने भरलेली एक प्लेट.

असे करा :

१. टिशू पेपर अर्ध्या भागामध्ये दुमडा आणि पहिल्या अर्ध्या भागात इंद्रधनुष्य लिहा.

२. ते उघडा आणि रंगीत स्केच पेनने एक इंद्रधनुष्य काढा.

३. टिश्यू पेपर पुन्हा फोल्ड करा.

४. पाण्याने भरलेल्या प्लेटमध्ये हळूहळू टिश्यू पेपर घाला.

पाहा :

जेव्हा आपण पाण्यात टिश्यू पेपर घालता तेव्हा पहिल्या पृष्ठावर इंद्रधनुष्य त्वरित दिसून येते.

विचार करा :

पहिल्या पानावर इंद्रधनुष्य कसे प्रकट होते?

जेव्हा टिशूला पाण्यात टाकले जाते तेव्हा ते ओले होते आणि पारदर्शक बनते. रंग आणि लेखी अक्षरे ठळकपणे प्रकाशित होतात. असे यामुळे होते कारण जेव्हा ते कोरडे असते तेव्हा टिशू पांढरे दिसते कारण ते सर्व रंगांना पांढऱ्या प्रकाशात रिफ्लक्ट किंवा प्रतिबिंबित करते म्हणजे दर्शविते. परंतु जेव्हा ते ओले होते तेव्हा ते कोणत्याही रंगास रिफ्लक्ट म्हणजे प्रतिबिंबित करू शकत नाही आणि ते पारदर्शक बनते.

प्रकाश प्रतिबिंबित होतो जेव्हा तो वळतो. प्रकाशाच्या या वळणाला अपवर्तन म्हणतात. प्रकाशाचे अपवर्तन त्या सामग्रीवर अवलंबून असते ज्यातून ते जाते. अपवर्तनात्मक निर्देशांक प्रकाशाच्या वळणाचे मापन आहे, जेव्हा प्रकाश एका माध्यमातून दुसऱ्या माध्यमात जात असतो. आमच्या प्रयोगाप्रमाणेच जेव्हा प्रकाश हवेने वाळलेल्या टिशूमध्ये जातो तेव्हा तो वळतो कारण ते दोन वेगवेगळे माध्यम आहेत, हवा आणि कोरडा टिशू. परंतु जेव्हा प्रकाश हवेने भिजलेल्या टिशूमध्ये जातो तेव्हा तो जास्त वळत नाही कारण पाणी आणि हवा फार जास्त वेगळे नाहीत आणि म्हणूनच टिशू पारदर्शक बनतो.

माहीत करुन घ्या :

अपवर्तक निर्देशांकाचा उपयोग कशा प्रकारे केला जात आहे?

शास्त्रज्ञांनी एक ग्लास म्हणजे काच बनविला आहे, जो अपारदर्शक (ज्यामधून प्रकाश जाऊ शकत नाही) बनविला जाऊ शकतो आणि एक बटण दाबताच पारदर्शकदेखील बनविला जाऊ शकतो. जेव्हा यास इलेक्ट्रॉनिक पद्धतीने चार्ज केले जाते तेव्हा ग्लासचा अपवर्तक निर्देशांक बदलतो. सध्या, काही लक्झरी मोटारींचे छप्पर अशाच काचेचे आहेत, जे फक्त एका बटणाच्या स्पर्शाने अपारदर्शक आणि पारदर्शक बनतात. भविष्यात आमच्या घराच्या काही भिंतीदेखील अशाच काचेच्या बनविल्या जातील, जिथे संपूर्ण भिंत एका विशाल खिडकीप्रमाणे पारदर्शक होईल. अशी कल्पना करा की छत अशाच प्रकारच्या सामग्रीची बनविली जाईल जी रात्री बटन चालू करताच पारदर्शक बनविली जाऊ शकेल जेणेकरुन आकाशातील तारे दिसू शकतील.

ओळखा पाहू

१. मी महाल बांधते
मी पर्वतांना फाडले
मी भरपूर प्रमाणात
वाळवंटात सापडते.

२. रात्रंदिवस माझ्यावर
लोक चालत असतात
मी कधीच झोपत नसतो
चालणे सुरक्षित बनवतो.

४. आहेत दोनदोन सुंदर मुलं
दोघांचा आहे एकसारखाच रंग
जर एखादा हरवला जाई
दुसरा काम ना येई.

४. जेव्हा आपल्याला लिहायचे असते
मी आपली मैत्रीण बनते
बंधू रे, हाच माझा गुण आहे
जेव्हापण कापले जाते तेव्हा नवी नवेली होते.

तुम्हाला माहीत आहे

१. जगातील प्रसिद्ध खजुराहो स्मारक कोठे आहे?
(क) गुजरात
(ख) ओडिसा
(ग) मध्य प्रदेश
(घ) महाराष्ट्र

२. सर्वप्रथम मानवाने कोणता धातू वापरला होता?
(क) लोखंड
(ख) पितळ
(ग) सोने
(घ) तांबे

३. पुढीलपैकी कोणते उष्ण कटिबंधीय गवताळ मैदान आहे?
(क) तैगा
(ख) सवाना
(ग) पंपस
(घ) प्रेरी

४. येथे आयसीएओचे तात्पर्य खालीलपैकी कोणत्यासाठी आहे?
(क) आंतरराष्ट्रीय नागरी उड्डयन संस्था
(ख) भारतीय कृषी संघटना
(ग) लेखा संघटनेची कंपनी संस्था
(घ) वरीलपैकी कोणतेही नाही

उत्तर : (ओळखा पाहू) : १. वाळू, २. फुटपाथ, ३. रेल्वे, ४. पेन्सिल.
उत्तर : (तुम्हाला माहीत आहे) : १. ग, २. ब, ३. ब, ४. क.

शब्द शोधा

क	ख	छ	त्री	है	गा	बं	गौ	झ	ड़	च
आ	छ	ग	आ	रि	जे	का	रू	जे	ढ़	टी
इ	ग	ग्री	ष	म	का	ळ	मी	द	ट्	झे
स्-	ढा	रा	म	घ	थ	खि	ल	सु	ने	ली
क्री	घ	म	आ	ण	भ	रं	ची	के	घि	झ
म	मु	जा	र	बा	ल	च्या	गि	औ	चें	रा
ना	स	सा	आं	गा	ळ	ल	को	बा	डू	टे
च	वा	को	का	हा	ख	द	म	दे	ए	सो
दे	प्र	ड़	न	र	ख	द	म	दे	ए	सो
या	छी	उ	का	प्रे	ना	स	उ	ष	ण	ता
स	ब	हं	झा	उ	न	हा	ळा	ना	छा	पा

वरील ग्रिडमध्ये खालील शब्द वर खाली, आडवे तिरपे दिले गेले आहेत. त्यांना शोधा.

ग्रीष्मकाळ
मजा
चेंडू
उन्हाळा
आंबा
आइस्क्रीम
छत्री
उष्णता
उन्हाळ्याची सुट्टी
प्रवास

उत्तर : शेवटच्या पानावर पाहा.

वय जुळवा

सुचना वाचा आणि डायनासोरांशी त्यांचे वय जुळवा.

- डीनो डायनासोर दुसऱ्यांपेक्षा सर्वात लहान आहे.
- जोजोचे वय तितकेच आहे, जितके त्याच्या शरीरावर पट्टे आहेत.
- किकी जोजोपेक्षा ४ वर्षांनी मोठा आहे.
- टॉली वर्षांच्या एका विशिष्ट संख्येसाठी जिवंत राहत आला आहे.



रोबोटमध्ये अनेक रोबोट एक आकार निवडतात. सुचना वाचा आणि कोण कोणत्या प्रकारचा आकार निवडतात ते शोधा.

- टिटोच्या आकारात एक वक्रता आहे.
- रॉबीने एक असा आकार निवडला आहे, ज्याच्या सहा बाजू आहेत.
- हॅटीच्या आकारात चार बाजू आहेत.
- टिग्गोचा आकार चौरस नाही.



उत्तर : शेवटच्या पानावर पाहा.

पंख्यांची प्रशंसक फराह

गोष्ट ● मुरली टीवी

फराह एक छोटीशी सुंदर मुलगी, पंख्यांची प्रशंसक होती. तिच्या आईबाबांच्या खोलीत एक सीलिंग फॅन म्हणजे छताचा पंखा होता, जो लाल रंगाचा होता. आजीच्या खोलीत पांढऱ्या रंगाचा पंखा होता. फराह जवळ निळ्या रंगाचा एक टेबल फॅन होता. असे असूनदेखील फराहची तक्रार होती, ''आपल्या स्टोअर रूम आणि कामाच्या ठिकाणी एकदेखील पंखा नाही. मला आपल्या पम्मी मांजरीसाठी एका छोट्याशा पिवळ्या रंगाच्या पंख्याची गरज आहे.''

''आपण प्रत्येक ठिकाणी पंखा लावू शकत नाही, जशी तुझी इच्छा आहे,'' फराहच्या आईने उत्तर दिले.

फराहचा चेहरा उतरला. निराश होऊन फराह आपला टेबल फॅन जो निळ्या रंगाचा होता, त्याच्याजवळ बसली आणि म्हणाली, ''मी कोणाशीच बोलणार नाही.''

'पंख्यांची प्रशंसक' म्हणत आजी असली आणि फराहच्या गुबगुबीत गालावर थोपटले. ती म्हणाली, ''माझ्या सोबत ये. चल काही नैसर्गिक पंख्यांचा आनंद घेऊ या.''

''नैसर्गिक पंखे,'' फराह आनंदाने किंचाळली.

''चला आत्ताच जाऊ या,'' अशाप्रकारे फराह आणि आजी फिरण्यासाठी निघाल्या.

घरापासून थोड्या अंतरावर एका टेकडीवर जाऊन आजी थांबली.

''दुकान कुठे आहे?'' फराहने विचारले.

''निसर्गच एक मोठे दुकान आहे. मी तुला खूप पंखे इथे दाखवेन,'' आजीने उत्तर दिले.

अचानक अंकल विंड म्हणजेच हवा काका हळूच उडाला. फराहचा फ्रॉक हवेत फडफडू लागला. काका हवाने फराहला कोमलतेने थोपटले.

''हा तर खूपच मुलायम आणि थंड आहे,'' फराह म्हणाली. आजीने टाळी वाजवली आणि काही आवाज काढले. कबुतर, पारवा आणि मैना तिथे आल्या आणि फराहच्या चहुकडे आपले पंख फडफडू लागले.

''व्वा, त्यांचे पंख तर पंख्यांसारखे आहेत,'' फराह टाळ्या वाजवत म्हणाली.

आजीने दाणे विखुरले. पारव्यांचा किलबिलाट ऐकून पुष्कळ पोपट, लव बर्ड्स आणि चिमण्या तिथे आल्या. फडफडणाऱ्या चिमण्यांनी फराहला खूश केले.

डूडी पारवा म्हणाला, ''मी तुझा पांढरा पंखा आहे,'' प्रेमळ लव बर्ड गुणगुणला, ''अरे मी तुझा गोऱ्या रंगाचा पंखा आहे,'' स्वीटी पोपट फराहच्या खांद्यावर येऊन कुजबुजला, ''मला पहा, मी तुझा हिरवा पंखा आहे.''

अचानक झाडीमधून पेन्नी मोर बाहेर आला आणि पंख फडफडवले. फराह ओरडली, ''पेन्नी पंखा. खूप सुंदर पंखा.''

फराह खुश होऊन तिच्या पंखांसोबत खूप खेळली.

''लवकरच अंधार होणार आहे. आता आपण घरी जाऊ या,'' आजी म्हणाली.

''नक्कीच,'' फराह म्हणाली. ''डॉली बदक आणि हिना कोंबडी माझे दोन्ही पंखे तर घरी आहेत. ते माझी वाट पाहत असतील,'' फराह नाचत गात आणि झाडे आणि पक्षांना बाय करत निघाली.

''तू खूपच बुद्धिमान आहेस, आजी. तू तर मला भरपूर पंखे दिलेस,'' फराह आजीला म्हणाली.

फराह डॉली आणि हिना जवळ बसली, ज्यांनी फराहला घरी परतलेले पाहून खुशीने आपले पंख फडफडवले. पुन्हा एकदा काका हवा कोमलतेने वाहू लागले. झाडे आपली पाने आणि फुलांसोबत डोलू लागली. पक्षांनी आपले पंख फडफडले आणि फुलपाखरे फराहच्या आजूबाजूला आनंदाने फिरू लागली.

फराहचा चेहरा एका मोठ्या हास्य सोबत उजळला. ती म्हणाली, ''व्वा मी तर पंख्यांची एक प्रशंसक बनले आहे.''

आई हसत म्हणाली, ''हो नक्कीच, तू पंख्यांची प्रशंसक आहेस. मला एका पंख्या विषयी काही सांग.''

फराहने पटकन उत्तर दिले, ''एक पंखा घरात खूप गरजेचा असतो. हा छत पंखा, टेबल फॅन किंवा स्टॅन्डवाला पंखा असू शकतो. हा खोलीचे सौंदर्य वाढवतो आणि उकाड्यामध्ये मला थंड हवा देतो.''

''व्वा हे तर खूपच अद्भुत आहे,'' आईने उत्तर दिले. ''वास्तविक लक्षात ठेव की एक पंखा प्रत्यक्षात खोलीचे तापमान कमी करत नाही, परंतु याच्यामुळे हवेच्या वाहण्याची पद्धत थंड होते. जेव्हा तू खोलीतून बाहेर जातेस तेव्हा पंखा बंद करीत जा. पंखे खोलीला थंड करत नाहीत, हे एक विंडचिल्ल प्रभाव बनवून खोलीला शांत म्हणजे थंड करतात.''

फराह हसली. आई विस्तृतपणे सांगू लागली, ''थंडपणा फक्त तोपर्यंतच राहतो जोपर्यंत पंखा

आपल्या त्वचेवरील हवेला हलवतो आणि आपल्या त्वचेवरच्या आर्द्रतेला बाष्पीभवन करून उडवतो. त्याला ऑपरेटिव्ह कूलिंग म्हणजेच बाष्पनशील शितलता म्हटले जाते. ते आपल्या शरीराला कॉंटॅक्टिव कूलिंग किंवा संवहनी शितलते पेक्षादेखील थंड करते, म्हणजेच वातावरणातील कोणत्याही थंड हवेला निर्देशित करून आपल्याला थंड करते. जर छताच्या पंख्याद्वारे बनवलेली हवेची गती कोणाच्या त्वचेवर जखम करत नाही, तर ते फक्त जागेला गरम बनवेल. थंड पाण्याचा कोणताच फायदा देणार नाही.''



''बाबांना दरवेळेस किती घाम येतो. मला वाटते की हे पंख्याच्या उंच असल्यामुळे होते, जिथे पंखे लावलेले आहेत,'' फराह म्हणाली.

''छान, तू तर एक शोधकदेखील बनली आहेस,'' आई म्हणाली. ''सर्वात उत्तम हवा लागण्यासाठी छत पंखा खोलीच्या मधोमध कमीत कमी ७ फूटवर उंच आणि भिंतीपासून १८ इंच अंतरावर लावायला हवा. तुम्हाला याच्या खूप खालीदेखील नाही लावायला हवा, कारण असे करणे धोकादायक होऊ शकते.''

''मला आपले टेबल फॅन खूप आवडतात कारण जिथे कुठे माझी इच्छा असेल त्याला घेऊन जाणे सोपे असते,'' फराह एका मोठ्या हास्यासोबत म्हणाली.

''बाबा मध्येच म्हणाले, ''फराह, औद्योगिक पंख्यांविषयी काही तुला माहीत आहे का?''

''औद्योगिक पंखे?'' फराहने आश्चर्याने विचारले. तिला त्या विषयी काही माहीत नव्हते.

''त्यांचा उपयोग औद्योगिक क्षेत्रात जसे की फॅक्टरीमध्ये केला जातो. ते प्रदूषण, वायू संदुशक, धूर आणि दुर्गंध दूर करून वातावरणाला निरोगी बनवतात. उष्णता आणि आर्द्रता कमी करून औद्योगिक पंखे मौल्यवान वातावरणीय फायदे उपलब्ध करून देतात. स्टॅंडिंग म्हणजेच मुक्त रूपाने उभे असणारे पंखे, भिंती आणि पॅनल माऊंटेड पंखे, वाहिनी पंखे आणि ब्लोअरदेखील असतात. औद्योगिक पंख्यांचा उद्योगांमध्ये कित्येक तऱ्हेचे उपयोग आहेत. काही तर सरळ मशीन थंड करतात. त्याच्या प्रक्रियेला थंड बनवतात. त्यांचा उपयोग अप्रत्यक्ष रुपाने औद्योगिक तापमान नियमन थंड करण्यासाठी केला जातो,'' बाबांनी सविस्तर सांगितले.

''अच्छा, पंख्यांची प्रशंसक असणारी मी कधी या गोष्टीदेखील समजत नव्हते,'' फराहने आनंदासोबत आश्चर्य व्यक्त केले.

''आईच्या किचनमध्ये एक वेगळ्या प्रकारचा पंखा आहे,'' फराहला आठवले.

''हो, तो एक्झॉस्ट पंखा आहे. तो दुर्गंध बाहेर फेकतो. धूर आणि आर्द्रता किचनच्या बाहेर काढतो आणि त्यांना खिडकीच्या बाहेरच ठेवतो. म्हणजे किचनमध्ये प्रवेश करू देत नाही,'' आईने उत्तर दिले.

अचानक वीज गेली. ''अरे माझे पंखे,'' फराह किंचाळली.

''काळजी करू नकोस,'' काका हवा वेगाने आला आणि पंख्यांची प्रशंसक फराहला थोपटू लागला. फराहचा सुंदर चेहरा एका मोठ्या हास्यसोबत उजळला, जेव्हा तिने पुष्कळ पक्ष्यांना आनंदने आपले पंख फडफडवताना पाहिले. ●

चीकू

चित्रकथा : दास

आज रात्री खूप गरम होत आहे. चल, टेरेसवर जाऊन झोपूया.
होय, ही एक चांगली कल्पना आहे.

ते छतावर झोपण्यासाठी पायऱ्या चढून वर गेले.
अरे, मीकू इतक्या जोरात घोरत आहे की मी कधीही झोपू शकणार नाही.

असे वाटते की मला रात्रभर फक्त तारे मोजत राहावे लागणार आहे.

रात्र गडद अंधारात पसरत होती आणि गार्ड डिग्गी कुत्रा गाणे गात गस्त घालत होता.
सावधान, जागृत रहा.

त्याचे गाणे ऐकून मीकूला जाग आली.
या गार्डने माझी झोप खराब केली.

आम्ही झोपणार, तो जागणार, मला या युक्तिवादावर विश्वास नाही, जर सर्वांना एक संरक्षक म्हणून जागत रहावं लागलं तर किती बरे होईल.

गार्डलाही आता थकल्यासारखे जाणवत होते.
आता जेव्हा सगळेच जागत आहे, तेव्हा मी जाऊन झोपू शकतो.

तो भिंतीलगत टेकून झोपला.
मी थकलो आहे. मला थोडा वेळ झोपायला हवं.

शिकारीच्या शोधात एक मांजर बाहेर निघाली होती.
गार्ड झोपलेला आहे. शिकार करण्याची हीच योग्य वेळ आहे.

मांजर छतावर चढली.
मला तिथे एक उंदीर झोपलेला दिसतो. मला गुपचूप तिथे जाऊन त्याला पकडले पाहिजे.
मांजरीने मीकूला पकडताच तो ओरडू लागला.
वाचवा, वाचवा, मला वाचवा.
अरे, मांजरीने मीकूला पकडले आहे.
सगळेच वर आले आहेत आता मला येथून खाली उडी मारली पाहिजे.
मांजरीने उडी मारली आणि खाली झोपलेल्या गार्डच्या अंगावर जाऊन पडली.
अरे, हे काय पडले, अरेरे माझी छाती.
वाचवा, हा तर डिग्गी गार्ड आहे, चला पळूया.
तुला पळायचे असेल तर पळ. पण मी तुला पळू देणार नाही.
त्यानंतर गार्डने मांजरीला लक्ष्य करुन आपली काठी फेकली.
मी तुला पळू देणर नाही.
काठी मांजरीला जाऊन लागली आणि ती खाली पडली.
अरे, माझा पाय, तुटला रे, बू हू हू ...
चीकू मीकूच्या दिशेने पळाला.
तू ठीक आहेस मीकू?
होय, मी ठीक आहे. आता आपण कधीही गच्चीवर झोपायचे नाही.

ठिपके जोडा

अंकानुसार ठिपके जोडा आणि चित्र पूर्ण करा.



मी गुप्तहेर आहे

ग्रीडमध्ये नमुने शोधा.



उत्तर : शेवटच्या पानावर पाहा.

मँगो पॉपसिकल

जेबा हेटवकर यांच्या सहकार्याने (बेक्ड फेवर्स)

आपल्याला हवंय :

- २५० ग्रॅम आंब्याचे तुकडे किंवा आंब्याचा गर.
- १/४ कप चिल्ड किंवा थंडगार पाणी.
- १/४ कप साखर.



१. साखरेचे निम्मे प्रमाण वापरा आणि आंब्याच्या गोडीशी सुसंगत प्रमाण एड्जस्ट करा म्हणजे मिळवा. त्यास आंबा आणि पाण्याबरोबर मिसळा आणि मिश्रण बनवा.

२. हे मिश्रण पॉपसिकलच्या साच्यामध्ये घाला. त्यावर पॉपसिकल स्टिक लावा आणि ते सेट होऊ देण्यासाठी ६ ते ८ तास फ्रीजमध्ये ठेवा, जोपर्यंत ते पूर्णपणे गोठले जात नाही.



३. त्यांना साच्यातून बाहेर काढा.

मासिकं वाचा ➔➔➔ प्रगती साधा

मासिकं वाचा. छापील ***सुंदर चित्र,*** ज्ञान वाढवणाऱ्या ***कथा*** वाचल्यानेच लक्षात ठेवण्याची सवय लागेल. टिव्ही आणि मोबाइलवरील फिरती छायाचित्रं मनात टिकाव धरत नाहीत.

टिव्ही कार्टुन्समध्ये मैत्री, प्रेम, सत्य कुठे असतं. ***मासिकं इच्छा असेल तेव्हा वाचा.*** छापील चित्र कापून सजवा, स्वतःच त्यात सुंदर रंग भरा. चुटकुले, कोडी सर्वांसोबत शेअर करा. अपटूडेट राहा. टिव्ही फक्त पाहता येतो.

बसमध्ये असो वा ट्रेनमध्ये अशावेळी मासिकंच सातत्याने सोबत बाळगता येतात. ***मासिकंच खरे मित्र*** ठरतात.



मासिकं वाचा, प्रगती साधा

आईसाठी काकण

देविका मेनन

स्मार्ट

९ मे हा मातृदिन आहे. तो साजरा करा. यासाठी भेटवस्तू घेण्यासाठी बाहेर जाऊ नका तर त्याऐवजी धागा वापरा.

तुम्हाला हवे : वेगवेगळ्या रंगांचे धागे, कात्री, कार्डबोर्ड, गोंद, पेन्सिल.

असे बनवा :

१. जर आपला धागा बारीक असेल तर एकाच रंगाचे दोन धागे वापरा. हे धागे एकत्र पकडा आणि एका टोकाला गाठ बांधा.



२. बांधलेल्या टोकावर एखादी वस्तू ठेवा जेणेकरून बांधलेले टोक खाली राहील आणि त्यास दाबून ठेवेल.



३. उलटपालट करून गुंफण्यासाठी उजवा धागा घ्या आणि तो मधल्या धाग्यावर ठेवा आणि त्यानंतर डावा धागा घ्या आणि त्यास दोन्हीवर आच्छादित करा, अशाचप्रकारे शेवटपर्यंत म्हणजे टोकापर्यंत पुनरावृत्ती करा.

४. आपले काकण बनून तयार आहे.

५. ते सजवण्यासाठी, कार्डबोर्डच्या वरील भागावर हृदयाचा आकार बनवा आणि तो कट करा.

६. हृदयाच्या आकारावर गोंद लावा आणि त्याच्या सभोवती धागा गुंडाळा.

७. हृदयाला काकणासोबत बांधा. अतिरिक्त धाग्याची छाटणी करा.

आपल्या घरी हे स्वतः बनवण्याचा प्रयत्न करा. आम्हाला आपल्या प्रवेशिका
writetochampak@delhipress.in वा एक फोटो काढून +91 9619587613 वर पाठवा.

चित्र पूर्ण करा

या चित्रात काही रिकामे भाग राहिले आहेत. चित्र पाहा, ते पूर्ण करा आणि मग यात रंग भरा.



विचित्र सहाय्यक फुरु

गोष्ट ● एस. वरालक्ष्मी

फुरु कोल्हा घरगुती कामगाराच्या रुपात फारुख कोल्ह्याच्या घरी काम करायची.

एक दिवस फारुखने आवाज दिला, ''फुरु फुरु'' फुरु पळत आला आणि विचारले, ''हा मालक, बोला.''

फारुख म्हणाला, ''माझा मुलगा भरपूर दिवसांनी दुबईहून येथे येत आहे. त्याला ठाऊक नाही की आम्ही कुठे राहतो. त्याला घेण्यासाठी कृपया एअरपोर्टला जा. त्याचे विमान एका तासात येणारच आहे.''

फुरु म्हणाला, ''पण मालक मी त्याला ओळखत नाही. मी त्याला कसे ओळखणार?''

फेन्नी तेव्हा थोडासा घुटमळला आणि मग फुरुच्या पाठीमागे जाण्याचा निर्णय घेतला.

अगदी त्याच वेळी फारुख घरी टीव्ही पाहत होता. एका पळालेल्या गुन्हेगाराच्या रनवे वरून गायब होण्याची बातमी फ्लॅश होत होती. त्या युवा गुन्हेगाराचा फोटोदेखील दाखवला जात होता. तो जवळपास ४ दिवसांपासून गायब होता.

फारुख घाबरला आणि त्याने प्रार्थना केली, ''हे परमेश्वरा, आशा आहे की लवकरच याला पकडले जाईल. तो किती खतरनाक दिसतो.''

तेव्हाच फोनची रिंग वाजली. त्याचे लक्ष विचलित झाले फारुख फोनवर उत्तर देत म्हणाला, ''हो हो. जर हे अर्जंट आहे तर मी लवकर येईन.''

त्यानंतर तो उदास होत म्हणाला, ''आता जेव्हा फारुखने त्याच्या विषयी वर्णन केले, ''त्याच्या मांसपेशी चांगल्या मजबूत आहेत आणि तो नेहमी टोपी घातलेला असतो. त्याचे नाव फेन्नी आहे.''

मनात या गोष्टी साठवत फुरु एअरपोर्टसाठी रवाना झाला आणि तिथे पोहोचून चहूकडे पहिले. इकडे तिकडे पाहिल्यानंतर त्याने एका कोल्ह्याला पाहिले, जो त्या वर्णनाशी जुळत होता. फुरु त्याच्याजवळ गेला आणि विचारले, ''तू फेन्नी आहेस का?''

कोल्ह्याने फुरुला विचित्र पद्धतीने पाहिले आणि जोरात गुरकावत म्हणाला, ''हो.''

फुरु हसला आणि म्हणाला, ''तेव्हा तुम्ही माझ्यासोबत चला. मालकांनी मला तुम्हाला रिसिव्ह करण्यासाठी पाठवले आहे.''

माझा मुलगाच येणार आहे तेव्हाच मला बाहेर जावे लागत आहे. मला आशा आहे की मी तासाभरात परतेन. हे चांगले आहे की फुरुजवळ घराची एक अतिरिक्त चावी आहे. जोपर्यंत मी परत येत नाही तोपर्यंत तो माझ्या मुलाच्या प्रत्येक गोष्टीची काळजी घेईल. मी खरोखरच खूप नशीबवान आहे की माझ्याजवळ त्याच्यासारखी जबाबदार व्यक्ती आहे.''

जेव्हा तो निघणारच होता, तेव्हा थांबला आणि पुन्हा विचार करू लागला, ''मला सगळ्या खिडक्या बंद करायला हव्यात. असे ना होवो की तो पळालेला गुन्हेगार इथे येऊन लपेल.'' त्यामुळे त्याने सगळ्या खिडक्या बंद केल्या आणि एक गाणं गुणगुणत घराबाहेर निघाला.

लवकरच फुरु फेन्नीला आपल्या सोबत घेऊन आला आणि दरवाजावर कुलूप पाहिले.

फुरु आश्चर्याने कुजबुजला, ''अरे, असे वाटते मालकांना बाहेर जावे लागले आहे. परंतु काही नाही. माझ्याकडे एक अतिरिक्त चावी आहे.''

त्याने घराचा दरवाजा उघडला आणि दोघे घरात आले.

फुरु म्हणाला, ''तुम्ही कृपया आराम करा. मी तुमच्यासाठी काही खाण्यापिण्याचे सामान घेण्यासाठी जातो.''

फुरु किचनमध्ये गेला आणि फेन्नीसाठी सॉफ्ट ड्रिंक आणि समोसे घेऊन आला, ज्यामुळे फेन्नीने लवकरच ढेकर दिली.

फुरुने विचार केला, ''बिचारा मुलगा. असा खातोय जसे त्याने कित्येक दिवसांपासून जेवण केले नाही.''

फेन्नीने आपले पोट भरल्यानंतर फुरुला विचारले, ''तू कोण आहेस?''

फुरु हसून म्हणाला, ''मी तुमच्या वडीलांसाठी काम करतो. काळजी करू नका. ते लवकरच परत येतील.''

फेन्नीने कळत नकळत मान हलवली. त्यानंतर फुरु त्याला सोडून काही काम करण्यासाठी निघून गेला.

फेन्नी सोफ्यावरुन उठला आणि चहुकडे पाहू लागला. त्यानंतर तो बेडरुममध्ये गेला आणि कपाटे उघडण्याचा प्रयत्न केला. तेव्हाच फुरु पाठीमागून आला आणि विचारले, ''काही शोधत आहात का सर?''

फेन्नी हबकला. तो अडखळत म्हणाला, ''अररर...मी... मी...''

फुरु हसून म्हणाला, ''मला समजले की तुम्ही तुमचे कपडे बदलू इच्छिता.''

फेन्नीने ताबडतोब हो म्हणून मान डोलावली.

फुरु त्याला म्हणाला, ''कपाटाची चावी गादीच्या

काही मदत करू? तुम्हाला कोणता कपडा मिळाला नाही का?''

फेन्नीने चिडून फुरुला पाहिले. तो म्हणाला, ''ऊंह, मी विचार केला की हे पैसे आणि दागिने एका सुटकेसमध्ये ठेवेन. अशाप्रकारे ते नेहमीच सुरक्षित राहतील. तुझ्याजवळ कोणती सुटकेस आहे का?''

फुरुने मान हलवली आणि पलंगाखालून एक सुटकेस ओढून बाहेर काढली आणि ती फेन्नीला दिली आणि त्यानंतर एका बाजूला उभा राहिला.

फेन्नीने फुरुला पाहिले आणि विचारले, ''तू मला थोडासा चहा बनवून देशील का?''

खाली आहे. परंतु स्वच्छ धुतलेले कपडे घेतल्यानंतर कृपया चाव्या गादीच्या खाली पुन्हा ठेवून द्या. मालक यासाठी खूप सतर्क असतात. ते नेहमी कोणत्या ना कोणत्या डाकूविषयी चिंतित असतात, की ते या कपाटातून पैसे लुटू नयेत. या कपाटात विशेषतः त्यांचे सगळे दागिने आणि पैसे आहेत.''

फुरु गर्वाने बोलत राहिला, ''परंतु यात काहीही संदेह नाही की घर सुरक्षित आहे आणि कुणीही लुटारू माझ्या समोर येऊ शकत नाही. आपली बुद्धिमत्ता आणि तत्परता म्हणजेच प्रसंगावधानसोबत मी कोणत्याही डाकूचा सामना करू शकतो.'' असे म्हणत त्याने गादीच्या खाली ठेवलेल्या चाव्या काढल्या आणि फेन्नीच्या हातात ठेवल्या आणि पुन्हा खोलीतून बाहेर निघून गेला.

फेन्नीने कपाट उघडले आणि लवकरच बेडवर सगळे सामान पसरले. कपाट रिकामे केले.

फुरु पुन्हा खोलीत आला आणि विचारले, ''मी तुमची

जसे फुरु तिथून गेला, फेन्नीने ताबडतोब सुटकेसमध्ये सगळे पैसे आणि दागिने भरले.

अगदी तेव्हाच फारुखने घरात प्रवेश केला. सगळीकडे पाहिल्यानंतर आणि कोणीच न आढळल्यानंतर त्याने आवाज दिला, ''फुरु तू कुठे आहेस? फेन्नी कुठे आहे? फेन्नी?''

अगदी तेव्हाच फेन्नी फारुखला धक्का देत निघाला आणि मुख्य दरवाजाकडे पळाला. फारुखची नजर फेन्नी आणि त्याच्या हातातील सूटकेसवर गेली.

सुरुवातीला तर तो चकित झाला परंतु ताबडतोब त्याने त्याला ओळखले. तो टीव्हीवरील बातम्यांमध्ये पळालेला गुन्हेगार होता, परंतु फारुखने काही करण्यापूर्वीच फेन्नी पळाला होता. फारुख जोराने ओरडला, ''चोर चोर.''

फुरु पळत आला आणि घाबरत विचारले, ''चोर? कोणता चोर मालक?''

फारुखने तिकडे इशारा केला जिकडे फेन्नी पळाला होता त्याने घाबरत विचारले, ‘‘तो चोर इथे काय करत होता आणि त्याच्या हातात जी सुटकेस होती आपली वाटत होती?’’

कसेबसे हसत फुरु म्हणाला, ‘‘मालक, तो एक चोर नाही. तुम्ही त्याला ओळखले नाही का? तो तुमचा मुलगा आहे. तुमचा फेन्नी. तो कुठे गेला?’’

फारुख किंचाळला, ‘‘तू काय मूर्खासारखं बोलत आहेस फुरु?

फुरुने सांगितले,’’ हो तुम्हीच तर मला त्याला एअरपोर्ट वरून रिसिव्ह करण्यासाठी सांगितले होते. मी त्याला भेटलो आणि त्याला इथे घेऊन आलो. तुम्ही घरी नसल्यामुळे मी त्याला आराम करायला सांगितले. मी त्याला खाण्यासाठी रिफ्रेशमेंट दिले आणि तुमच्या कपाटातून बदलण्यासाठी कपडे दिले. तुम्हाला ठाऊक आहे की त्याने आपले कपडे का नाही बदलले?’’

अंदाज होता तो सुटकेस तीच होती, जी त्याने आणली होती जेव्हा तो घर सोडून गेला. परंतु तो गेला कुठे?’’ त्याने भोळेपणाने विचारले.

फारुख रागाने ओरडला, ‘‘मुर्खा, तुझा अर्थ संपूर्ण पैसे आणि दागिने यांच्याशी आहे का?’’

फुरुने उत्तर दिले, ‘‘हो मालक. मला पूर्ण विश्वास आहे. त्याने सगळे काही सुटकेसमध्ये पॅक करून घेतले असणार. मला लक्षात आले आहे की तुम्ही माझ्यावर खुश नाही आहात कारण मी त्याला किचन मधून चांदीची भांडी द्यायला विसरलो.’’

परंतु फारुख तर आधीच बेशुद्ध होऊन पडला होता. फुरुने ताबडतोब एक ग्लास पाणी आणले आणि त्याच्या चेहऱ्यावर पाणी शिंपडले.

तो स्वतःशी म्हणाला, ‘‘मला त्या धक्क्याचा अंदाज आहे जो यांना पुष्कळ दिवसांनी आपल्या मुलाला बघून बसला आहे. धक्का बराच मोठा आहे.’’ ●

फारुख भीतीने स्वतःला कमजोर समजू लागला. तो विचारल्यानंतरही घाबरत होता, परंतु त्याला विचारायचे तर होते. तो खुसफुसला, ‘‘कपाट? मला असे वाटते की तू त्याला बेडरूममध्ये तर घेऊन गेला नसशील.’’

फुरु आनंदाने म्हणाला, ‘‘का नाही मालक? शेवटी तो तुमचा मुलगाच तर आहे.’’

फुरु गर्वाने म्हणत राहिला, ‘‘मी केवळ त्याला एवढेच सांगितले नाही, की तुम्ही चावी कुठे ठेवता, तर कपाट आणि ड्रॉवरदेखील उघडायला सांगितले. मी त्याला तुमचे पैसे आणि दागिने सुरक्षित ठेवण्यासाठी एक सूटकेसदेखील दिली. मला



आजोबा आणि जागतिक नर्स दिन

गोष्ट ● विवेक चक्रवर्ती

तुम्ही फ्लॉरेन्स नाईटिंगेलबद्दल ऐकले आहे का?
फ्लॉरेन्स नाइटिंगेल एक नर्स होती का, आजोबा?
होय, ती एक नर्स होती, जेव्हा क्रिमियात युद्ध चालू होते, तेव्हा रात्री हातात दिवे घेऊन ती रणांगणात जखमी सैनिकांची सेवा करत होती. त्यामुळेच ती 'लेडी विथ लँप' म्हणून प्रसिद्ध झाली.
१२ मे हा आधुनिक नर्सिंगची संस्थापक फ्लॉरेन्स नाइटिंगेलचा वाढदिवस आहे. आरोग्याच्या क्षेत्रात नर्सचे योगदान दर्शविण्यासाठी याच दिवशी आंतरराष्ट्रीय नर्स दिवस साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश जगभरातील नर्सना त्यांच्या कार्याबद्दल केवळ आदर देणेच नव्हे तर फ्लॉरेन्स नाईटिंगेल यांना श्रद्धांजली वाहणे हेदेखील आहे.
बघितले, एका नर्सचे काम किती महत्त्वाचे असते?
हो, पण मी नाटकात फ्लॉरेन्स नाईटिंगेलसारख्या नर्सची भूमिका करू शकले असते तर किती बरे झाले असते?
तू फ्लॉरेन्स नाइटिंगेलसारखी नर्स का होऊ शकत नाही, तू फ्लॉरेन्स नाइटिंगेलचीच भूमिका करणार आहेस. हे नाटक त्यांच्यावर आधारित आहे.
अरे, जर तू मला आधीच ही गोष्ट सांगितली असती तर मी तुझ्याशी कधीच वाद घातला नसता.
मी तुला सांगण्याचा प्रयत्न करीत होतो पण तू ऐकायलाच तयार नव्हती.
SONAL
राहुलने असं म्हटल्यावर रिया खजील झाली. आजोबा हसू लागले.

उन्हाळ्याचा उन्माद



आपल्याला हवंय : एक ब्लॅंक शीट, पेन, डाइस, गेम पीसी म्हणजे गोटी.

खेळाडू : २ किंवा अधिक

यासारखे खेळा :

१. पहिला खेळाडू फासे टाकेल म्हणजे चालेल आणि आपल्या गेम पीसीला म्हणजे गोटीला दिल्या गेलेल्या रिकाम्या संख्येच्या जागेवर वाढवेल.

२. समर एलिमेंटच्या ब्लॉकवर म्हणजे जागेवर उतरणाऱ्या खेळाडूला बरेचसे गुण मिळतील. यासाठी आपण स्कोरकार्ड तपासावे.

३. ज्या खेळाडूला सर्वात जास्त गुण मिळतील किंवा ज्या खेळाडूने सर्वात आधी अंतिम रेषा गाठली असेल त्याला विजयी मानले जाईल.

स्कोअर कार्ड

	१ पॉइंट्स
	१ पॉइंट्स
	५ पॉईंट्स
	३ पॉइंट्स
	१० पॉइंट्स

आकृत्यांचे क्रम बनवा

नमुना पूर्ण करण्यासाठी रिकाम्या आकृत्या रंगांनी भरा.









उत्तर : शेवटच्या पानावर पाहा.

फरक सांगा

इथे १० चुका आहेत. त्या चुका शोधून सांगा.

आमची आणि त्यांची सामाजिकता

उत्तर मध्य आणि दक्षिण अमेरिकेतील नद्या आणि खाड्यांमध्ये भव्य नदी पाणमांजर आढळतात. ते पाणमांजरच्या सर्वात मोठ्या उपप्रजातीचे आहेत आणि ते ६ फुटांपर्यंतच्या लांबीत वाढू शकतात.

मानवाप्रमाणेच पाणमांजरदेखील सामाजिक प्राणी आहेत आणि ते गटा गटात राहतात. प्रत्येक गटाला कुटुंब किंवा कळप म्हणतात, ज्यात ३ ते २० सदस्य असतात. भव्य नदी पाणमांजर सर्वात चुरचुरीत प्रजाती आहे आणि शास्त्रज्ञांचा असा विश्वास आहे की त्यांनी एक मोठा शब्दसंग्रह विकसित केला आहे कारण त्यांचे कुटुंब मोठे आहे, ज्यात ते राहतात.

भव्य नदी पाणमांजर धोक्यादरम्यान इतर पाणमांजरांच्या कुटुंबांना सावध करण्यासाठी शिक्क्या मारतात. हूम किंवा कुचा आवाज आपल्या गटातील सदस्यांची किंवा आपल्या मुलांच्या संख्येची खात्री करण्यासाठी आणि आपली आवड दर्शविण्यासाठी 'याह'चा आवाज काढतात. पाणमांजराच्या कुटुंबांच्या एका विशिष्ट गटाकडे एक गीत किंवा सूर असतो ज्याचा उपयोग ते इतर पाणमांजराच्या कुटुंबांसह त्यांचा परिचय सामायिक करण्यासाठी करतात, ओरडून सांगतात. तरुण भव्य नदी पाणमांजर ११ प्रकारचे विशेष ध्वनी काढण्यास सक्षम असतात, ज्यातील काही फक्त लहान पाणमांजरांमध्येच पाहिले गेले आहेत. उदाहरणार्थ, लक्ष वेधण्यासाठी ते ओरडतात. ते गटाच्या क्रियाकलापांमध्ये भाग घेतानासुद्धा व्हाईन आणि वायल म्हणजे चाबूक मारल्यावर विव्हळण्याचा आणि विलाप करण्याचा आवाज काढतात.

पाणमांजराचा केस कोणत्याही सस्तन प्राण्याच्या तुलनेत सगळ्यात मोठे असते. प्रति चौरस इंच १ लाख केस असतात.

शांत महाराणी

गोष्ट ● मल्लिका सुकुमार



नूर नावाची एक वाघीण महाराणी होती, जी घमंडी आणि गमर स्वभावाची होती. ती विनाकरण गुरकावायची, दहशत पसरवायची आणि जंगलातील प्राण्यांना घाबरवायची.

तिचा अत्यंत जवळचा सहकारी प्रधानमंत्री जोजो हत्ती खूपच बुद्धिमान होता. तो म्हणाला, ''महाराणी, तुम्ही अशाप्रकारे रहिवाशांना घाबरवायला नाही पाहिजे. तुम्ही राजा आहात त्यामुळे तुम्हाला त्यांचे रक्षक व्हायला हवे.''

नूर महाराणी ओरडली, ती म्हणाली, ''का? कारण ते माझे रहिवासी आहेत? मी महाराणी आहे. ही त्यांची जबाबदारी आहे की त्यांनी माझ्या आदेशाचे पालन करावे आणि माझ्या इच्छा पूर्ण कराव्यात.''

जोजो गप्प झाला. त्याने विचार केला महाराणीशी नंतरच बोलणे योग्य ठरेल.

एक दिवस नूर महाराणी आणि जोजो हत्ती एका तलावात अंघोळ करीत होते.

जोजोने नूर महाराणीला विचारले, ''मी तुम्हाला एक गोष्ट सांगू का?''

नूर महाराणीला गोष्टी ऐकायला आवडायचे. ती म्हणाली, ''हो नक्कीच.''

जोजो म्हणाला, ''एक दिवस बिंगो सिंह जंगलात भटकत होता आणि त्याने एका उंदराला पकडले. तो उंदराला म्हणाला, ''मी तुला खाऊन टाकेन.''

भीतीने कापत मूसी उंदीर म्हणाला, ''कृपया मला खाऊ नका. मी तुमच्या दयाळूपणाची एक दिवस नक्कीच परत फेड करीन.''

बिंगो सिंह जोराने हसू लागला. ''छोट्याशा जीवा, तू कसे कधी माझे उपकार फेडू शकशील? असो. तू गयावया केल्यामुळे मी तुला सोडत आहे. पुढच्या वेळी सावध राहा.''

मुसी उंदराने आभार मानले आणि परत आपल्या बिळात गेला.

काही दिवसांनी मूसी उंदराने बिंगो सिंहाच्या

कण्हण्याचा आवाज ऐकला, ‘‘मी शिकाऱ्याच्या जाळ्यात फसलो आहे मला वाचवा.’’

मूसी उंदीर आपल्या बिळातून बाहेर आला आणि त्याने बिंगो सिंहाला जे वचन दिले होते त्याची त्याला आठवण झाली आणि त्याने त्याच्या चहूबाजूंनी जाळे कुरतडायला सुरुवात केली. लवकरच त्याने एक मोठे भोक जाळीमध्ये केले. त्यामुळे बिंगो वाचला आणि पळण्यात यशस्वी झाला. जसे बिंगो जाळ्याच्या बाहेर आला, मूसी उंदीर पळण्यासाठी तयार झाला. बिंगो म्हणाला, ‘‘पळू नकोस, मी तुझे नुकसान करणार नाही.’’

मुसी म्हणाला, ‘‘याची काही गॅरंटी आहे? मला आपला जीव प्यारा आहे. मी तुमच्या दयाळूपणाची परतफेड केली आहे. आता तुम्हाला समजले असेल की छोटासा जीवदेखील महत्त्वाचा असतो. शिकारी इथे येण्यापूर्वी लवकर घरी निघून जा.’’

बिंगो सिंहाला खूप राग आला आणि तो मुसीवर चिडला आणि गरजला, ‘‘तू स्वतःला काय समजतोस छोट्याशा तुच्छ जीवा?’’

अगदी तेव्हाच गाडीच्या चाकांचा आवाज ऐकू आला. बिंगो सिंह इतक्या रागात होता, की तो नीट विचार करू शकत नव्हता आणि आपला जीव वाचवण्यासाठी निर्णय घेऊ शकला नाही. राग आणि घाईमुळे तो शिकाऱ्यांच्या गाडी पासून दूर पळण्याऐवजी त्याच दिशेने पळू लागला.

आश्चर्याची गोष्ट तर ही होती की चिडलेल्या सिंहाला पाहून शिकारीदेखील घाबरले होते आणि गुरकावणाऱ्या सिंहाला पाहत ते आपल्या गाडीकडे पळू लागले. त्यांनी ताबडतोब आपली गाडी वळवली आणि अत्यंत वेगात जंगलाच्या बाहेर पळाले.

बिंगो धक्क्याने खाली बसला. तो चकित झाला होता की त्याला नेमके झाले तरी काय की तो धोक्यापासून दूर पळण्याऐवजी धोक्याकडे जाऊ लागला होता.

मुसी उंदीर, ज्याने संपूर्ण घटना पाहिली होती बाहेर आला आणि त्याच्या समोर बसला. तो हळूच बिंगोला सल्ला देत म्हणाला, ‘‘तुम्ही नशीबवान निघालात की ते पळून गेले. तुमच्यासाठी चांगले राहील की तुम्ही डॉक्टर बब्बल अस्वलाला दाखवून आपले ब्लड प्रेशर तपासून घ्या.’’ त्यानंतर त्याने आपला आवाज वाढवला आणि बिंगोला रागावून म्हणाला, ‘‘तुम्ही करत काय होता? दुसरीकडे पळण्याऐवजी तुम्ही त्यांच्याकडेच पळत होता. तुम्ही त्यावेळी योग्य विचार करू शकत नाही जेव्हा घाईमध्ये काहीतरी करता आणि रागात असता.’’

बिंगो गरजला, ‘‘हा डॉक्टर बब्बल अस्वल कोण आहे? ब्लड प्रेशर काय असते?’’

मूसी म्हणाला, ‘‘डॉक्टर बब्बल अस्वल एक खूपच सहृदय आणि गोड बोलणारे डॉक्टर आहेत. मी तुम्हाला त्यांच्याकडे घेऊन जाईन. सगळे छोटे आणि मोठे प्राणी आणि पक्षी आपापल्या तब्येती संबंधीच्या तक्रारी घेऊन त्यांच्याकडे जातात. ते तुमच्या प्रश्नांची उत्तरे ब्लडप्रेशर पाहून देतात. फक्त माझ्यावर कोणता दबाव टाकू नका.’’

बिंगो म्हणाला, ''ठीक आहे, चल त्यांच्याकडे जाऊ या.''

मूसी म्हणाला, ''ठीक आहे, चला.''

ते डॉक्टर बब्बलच्या क्लिनिकमध्ये गेले. काही रुग्ण आधीपासून रांगेत होते. बोंकी पोपटाची चोच दुखावली होती, स्वीटी सशाचा एक पाय जखमी होता, ग्रिंपी डुक्कर आजारी होते आणि रीनी बुलबुलच्या पंखांच्या बाजूने सुतळी लपेटलेली होती.

मुसीने बिंगोला सांगितले, ''आपण आपली पाळी येण्याची वाट पाहूया. मला खाण्याविषयी विचारदेखील करू नका. डॉक्टर तुम्हाला एक इंजेक्शन देतील जर तुम्ही असे काही करण्याचा विचारदेखील केला तर. माझे आभार माना की मी तुम्हाला इथे घेऊन आलो आहे.''

बिंगोने रागाने आणि अधीरतेने मुसीकडे पाहिले, पण शांत राहिला.

क्लिनिकच्या बाहेर एक फूड कॉर्नर होता. बिंगोकडे जे पैसे होते, ते देऊन तो एक प्लेट भाजी खाण्यासाठी तिथे गेला. त्यानंतर तो क्लिनिकमध्ये परतला आणि मुसीला काही खाणे खाण्यासाठी दिले.

मुसी म्हणाला, ''या दयाळूपणासाठी धन्यवाद. चांगले झाले की तुम्ही काहीतरी खाऊन घेतले. नाहीतर तुम्ही आमच्या चांगल्या डॉक्टरांनाच खाल्ले असते.''

बिंगो ओरडला, ''मी इतकादेखील वाईट प्राणी नाहीए.''

मुसी म्हणाला, ''तुम्ही बिलकुल वाईट नाहीए, फक्त तुमची भूक नेहमी वाईट असते.''

त्यांची पाळी आली होती.

बिंगो आत गेला आणि डॉक्टर बब्बल जवळ बसला. डॉक्टर बब्बलने बिंगोवर एक नजर टाकली आणि आपले ब्लड प्रेशर मॉनिटरिंग मशीन काढले. डॉक्टर बब्बलने त्याची तपासणी केली आणि त्यानंतर त्याला म्हणाला, ''तुला हाय ब्लड प्रेशर आहे. आपली काही वागणूक बदलण्याचा प्रयत्न कर आणि दुसऱ्या चेकअपसाठी बरोबर ५ दिवसांनी ये. जर हे असेच असेल, तर मला तुला गोळ्या द्याव्या लागतील.''

बिंगो निराश झाला. त्याला काही समजत नव्हते. डॉक्टर बब्बल बसले आणि सविस्तरपणे त्याला समजावू लागले. ''हो तर तू स्वतःकडून अशा प्रकारचा राग आणि तणावासाठी काय आशा करतोस? ऐक, फक्त यासाठी की तुमची प्रजाती जंगलाचा राजा असते तर याचा अर्थ हा नाही की तू जोराने ओरडावेस किंवा चिडावेस. जेव्हा तुझी इच्छा होईल, लक्ष असेल. जो ओरडतो किंवा किंचाळतो त्याला अपरिपक्व समजले जाते. तुला जास्तीत जास्त शांत असणे शिकायला हवे. शांत असण्याचा अर्थ विनम्र होणे असा नाही याचा अर्थ फक्त समजूतदार असणे आहे. जंगलातील इतर पक्षी आणि प्राण्यांच्या बाबतीत समजूतदार बनायचे आहे. शहरांमध्ये राहणारे मनुष्य इतके तणावात असतात की बहुतेकांना हाय ब्लड प्रेशरच्या गोळ्या घ्याव्या लागतात. जर आपण आत्ता शांत राहणे शिकलो नाही तर आपल्यालादेखील या गोळ्यांची गरज भासायला लागेल.''

बिंगोने विचारले, ‘‘हे ब्लड प्रेशर काय असते? ते वाढते कसे काय?’’

डॉक्टर बब्बलने विस्तृतपणे समजावले, ‘‘ब्लड प्रेशर एक मोजमाप आहे जे सांगते की रक्तवाहिन्यांच्या माध्यमातून हृदय रक्ताला धक्का देण्यासाठी किती मेहनत करीत आहे.’’

बिंगो सिंहाने मान हलवली. डॉक्टर बबल म्हणाले.

‘‘जेव्हा तुम्ही रागात असता किंवा तणावात असता, तेव्हा सामान्य रूपाने हृदयाला जास्त काम करावे लागते आणि तुमचा रक्तदाब वाढतो. हा केवळ तुमच्या शरीराला प्रभावित करत नाही तर तुमच्या मेंदुवरदेखील परिणाम करतो. मुसीने मला आत्ता फक्त हे सांगितले की तू शिकाऱ्यांच्या गाडीकडे पळत होतास.’’

बिंगोने आपल्या शेजारी उभ्या असलेल्या मुसी उंदराकडे पाहिले आणि डॉक्टर बब्बलला सांगितले,

‘‘मी या छोट्याशा उंदरावर रागावलो होतो.’’

डॉक्टर बब्बल म्हणाले, ‘‘तो एक खूप बुद्धिमान उंदीर आहे. तुम्ही दोघेही चांगले दोस्त बनू शकता.’’

मुसीने बिंगोकडे टोमणा मारल्याच्या अविर्भावात पाहिले.

बिंगो डॉक्टर बब्बलला शांत स्वरात म्हणाला, ‘‘तुम्ही योग्य बोलत आहात. आम्ही चांगले मित्र आहोत, डॉक्टर. आज पासून मी शांत राहीन.’’ त्यानंतर तो मुसीकडे वळला आणि म्हणाला, ‘‘आता तू माझ्या पाठीवर बसून जंगलातून फेरफटका मारशील.’’

मुसी आनंदी होता. तो उडी मारत म्हणाला, ‘‘याचा अर्थ तू शांत झाला आहेस. धन्यवाद बिंगो.’’

महाराणी नूर जी शांततेने गोष्ट ऐकत होती ती जोजोला म्हणाली, ‘‘ओके, आता मीदेखील अशीच बनेन. आता पासून एक शांत महाराणी.’’

जोजोने महाराणीवर आपल्या सोंडेने पाणी भरून टाकले.

महाराणी नूरने स्वतःला ‘रागीट राजा’पासून ‘शांतिप्रिय राजा’च्या रूपात बदलले. आता जंगलातील सगळे प्राणी खूश होते. ●

हॉस्पिटलची शिकार

१२ मे हा आंतरराष्ट्रीय नर्स दिन आहे. खालील चित्र पहा आणि आपल्याला रुग्णालयात आढळणाऱ्या ११ गोष्टी ओळखा.

उत्तर : शेवटच्या पानावर पाहा.

छोट्यांच्या लेखणीतून



आरभी विभास, ८ वर्ष,
कोईमतूर

आतला प्रकाश

पहिल्या दिवशी जेव्हा मी घराबाहेर पडलो, तेव्हा मी प्रकाशात भटकत राहीलो. मला एक प्रकाश मिळाला. तो मला म्हणाला, ''फक्त बघ आणि बघ, तू ज्या मार्गाचा शोध घेत आहेस तो हाच आहे का? तू कोठेही जाऊ शकतो, लक्षात ठेव, जर तू भटकलास तर आत असलेल्या विवेकाच्या प्रकाशाबद्दल विचार कर. तारेप्रमाणे यास चमकू देत. तू कोण आहेस याचा विचार कर, हे एक स्वप्न तर नाही ना? ताबडतोब घरी जा आणि पहा की हे एक स्वप्न नाही. हा हृदयाचा प्रकाश आहे, तू फार तेजस्वीपणे चमकत असेल.

गीत कौर, ११ वर्ष
नवी दिल्ली

अणिका, ९ वर्ष, हरियाणा

टिकटॉक टिकटॉक

टिकटॉक टिकटॉक, घड्याळ दिवसभर चालू राहते. जेव्हा मी माझ्या मैत्रिणींशी बोलू इच्छिते तेव्हा वेळ इतका वेगवान का पळतो? टिकटॉक टिकटॉक दिवसभर घड्याळ चालूच असते. वेळ नुकतीच माझ्या हातातून निसटली. मला तिला लॉक करून थांबवायचे आहे, टिकटॉक टिकटॉक, दिवसभर हे घड्याळ सतत चालू राहते. दिवसभर हे आपल्याला आठवण करून देत राहते की आपल्याला कधी खेळायचे आणि कधी वाचायचे लिहायचे व काम करायचे आहे. मी तुम्हाला सांगते, मित्रांनो, वेळेची काळजी घ्या आणि ही काही मूर्खपणाची गोष्ट नाही. फक्त घोरण्यात आणि विव्हळण्यात वेळ वाया घालवू नका आणि लवकरच तुम्ही पाहाल की तुम्ही चमकू लागला आहात.

पूर्वी जैन, ११ वर्ष, राजस्थान

तिष्या मित्तल, ६ वर्ष, नवी दिल्ली

जीवन चक्र

आपल्याला पाहत असलेले वाळलेल्या नीलगिरीच्या शिखरावरील पोपट, आंब्याच्या झाडातील विवर म्हणजे खोड आणि आपल्याला दिसणारे मोहोर व फळे, ते आपले जीवन आणि सभोवतालच्या वातावरणाचे चक्र आहे. ते सर्व सोन्यापेक्षा अधिक मौल्यवान आहेत. इतक्या सर्व गोष्टी आश्चर्याने बघण्यासाठी आहेत. विजेकडे पहा आणि तिच्या कडकडाटापासून घाबरा. आपल्याला निसर्गाची गुपिते सादर करायची असतील तर त्यांना योग्य ती जागा द्या, जो त्यांचा अधिकार आहे. ही एक साखळी आहे, स्त्रोताचे एक चक्र आहे आणि निसर्ग हीच त्याची जीवनशक्ती आहे. प्रत्येक पानाजवळ सांगण्यासाठी एक कथा आहे, जसे प्रत्येक पक्ष्याला राहण्यासाठी एक जागा असते. आपण स्वतःची जादूची शक्ती शोधली पाहिजे. आपल्याला ती प्रत्येक झाडाच्या प्रत्येक विवरमध्ये दिसेल. मगर बूक तुम्हाला पाहून हसतो, तो तुम्हाला त्याच्याबरोबर खेळायचे निमंत्रण ही देतो. आपल्याला याची जादू जाणवावी लागेल, यासाठी आपल्याला एकांत आणि बुद्धिमत्तेची आवश्यकता आहे. आता जा आणि एंजॉय करा, जीवन चक्राचा आनंद लुटा.

अनुशा शुक्ला, ११ वर्ष, जबलपूर

सिमरन चौबे, ११ वर्षे, मुंबई

ग्रिश्मा डी वसिष्ठ, ९ वर्ष, बंगळुरू

फूल

सुंदर रंगात आणि आकारात बागेत आणि शेतात विखुरलेले आहेत. ते कल्पनेपलीकडे सुगंध पसरवत आहेत. ते हवेत जोरजोरात नाचत आहेत. मधमाश्या आणि फुलपाखरे सर्वत्र घोंघावत आहेत आणि जवळून जाणाऱ्यांना म्हणजे वाटसरूंना आनंद आणि शांती देत आहेत. जसजशी रात्र सुरू होते तसतसे त्यांचे डोके डगमगू लागते, चला, आता त्यांना झोपू द्या आणि पुन्हा सूर्योदय होईपर्यंत प्रतीक्षा करा. सकाळ होऊ द्या.

आर सहाना, ११ वर्ष, चेन्नई.

ही एक पतंग आहे. यास आमच्या ११ वर्षाची वाचक साशा तेजस राणे हिने मुंबईहून बनवून पाठवले आहे.

तुमची कोडी, विनोद, चित्रं वा गोष्टी, तुमचं नाव, वय, पत्ता तसंच फोन क्रमांकासोबत लिहा :

चंपक, दिल्ली प्रेस, ए-४. श्रीराम इंडस्ट्रियल इस्ट्रेट, वडाळा, मुंबई - ४०० ०३१.

writetochampak@delhipress.in 9619587613

www.facebook.com/ChampakMagazine

http://www.youtube.com/ChampakSciQ

आम्ही आपलं साहित्य परत पाठवू शकत नाही म्हणून आपण आम्हाला पाठविलेल्या साहित्याची प्रत आपल्याजवळ ठेवा.

उत्तर पृष्ठ :

पृष्ठ ८ : मार्ग दाखवा :



पृष्ठ १९ : शब्द शोधा :

क	ख	**छ**	**त्री**	है	गा	बं	गौ	झ	ड़	च
आ	छ	ग	आ	रि	जे	का	रू	जे	ढ़	**टी**
इ	ग	**ग्री**	**ष**	**म**	**का**	**ळ**	मी	द	**ट्**	झे
रु	ढा	रा	म	घ	थ	खि	ल	**सु**	ने	ली
क्री	घ	**म**	आ	ण	भ	रं	**ची**	के	घि	झ
म	मु	**जा**	र	**बा**	ल	**चा**	गि	औ	**चें**	रा
ना	**स**	सा	**आं**	गा	**ळ**	ल	को	बा	**डू**	टे
च	**वा**	को	का	**हा**	ख	द	म	दे	ए	सो
दे	**प्र**	ड़	**न**	र	ख	द	म	दे	ए	सो
या	छी	**उ**	का	प्रे	ना	स	**उ**	**ष**	**ण**	**ता**
स	ब	हं	झा	**उ**	**न**	**हा**	**ळा**	ना	छा	पा

पृष्ठ २० : वय जुळवा : डीनो ५ वर्षाचा आहे, जोजो ६ वर्षाचा आहे, किकी १० वर्षाचा आहे, टॉली ९ वर्षाचा आहे आणि टिनो ८ वर्षाचा आहे.

टिटोने एक वृत्त निवडले, रॉबीने षटकोन निवडले, हॅटीने एक वर्ग निवडला आणि टिग्गोने त्रिभुजा निवडला.

पृष्ठ २७ : मी गुप्तहेर आहे :



पृष्ठ ४१ : आकृत्यांचे क्रम बनवा :



पृष्ठ ४७ : हॉस्पिटलची शिकार :

WE SPEAK IN 30 DIFFERENT CONSUMER VOICES.

BECAUSE EVERY BRAND IS UNIQUE.

With virtually every age group, income segment and language covering 30 million Indians, we are the most diverse magazine group in India. So next time you want to address anyone in India, you are better off speaking to the **Delhi Press** Group today.

DELHI PRESS

To subscribe to our magazines Call/SMS/WhatsApp: 08588843408,
E-mail: subscription@delhipress.in, You can also subscribe online at www.delhipress.in/subscribe

THE CARAVAN · CHAMPAK · सरिता · गृहशोभा · चंपक · मुक्ता · सरस सलिल · फार्मफूड · सत्यकथा · मनोहर कहानियां

ગૃહશોભા · ચંપક · સરસ સલિલ · ગૃહશોભા · ચંપક · સલિલુ · ಗೃಹಶೋಭಾ · ಚಂಪಕ · ಸರಳ್ · ಗೃಹಶೋಭ · చెంపరే

ಗೃಹಶೋಭಾ · ಗೃಹಶೋಭ · ചംപക് · സലിൽ · చంపక్ · Highlights CHAMPS · Highlights Genius · MOTORING

(REGISTERED) RNI 21806/75 DL(C)-14/1095/2021-23 WPP U(C) 152/2021-23. P.O. SRT Nagar ND-55 Posting Dt. 03 to 09. Published on 26/04/2021. Pgs.52